CIDCO
WE MAKE CITIES

प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

सिडको
शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. ०९.११.२०२०**

## सिडकोच्या पोलीस कर्मचारी विशेष गृहनिर्माण योजनेची संगणकीय सोडत १० नोव्हेंबर २०२० रोजी

सिडको महामंडळातर्फे पोलीस कर्मचाऱ्यांकरिता विशेष गृहनिर्माण योजने अंतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या ४,४६६ घरांची संगणकीय सोडत **मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२०** रोजी ७ वा मजला, सिडको सभागृह, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता काढण्यात येणार आहे.

सिडको महामंडळातर्फे पोलीस कर्मचाऱ्यांकरिता एका विशेष गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ २७ जुलै २०२० रोजी करण्यात येऊन त्या अंतर्गत ४,४६६ घरे (सदनिका) पोलीस कर्मचाऱ्यांकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. सदर गृहनिर्माण योजने अंतर्गत पोलीस कर्मचाऱ्यांकरिता नवी मुंबईतील तळोजा, खारघर, कळंबोली, घणसोली आणि द्रोणागिरी या पाच नोडमध्ये ४,४६६ सदनिका साकारण्यात येत आहेत. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गट यांकरिता उपलब्ध असणाऱ्या या योजनेतील सदनिका या केवळ मुंबई महानगर क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांकरिताच राखीव आहेत. एकूण ४,४६६ सदनिकांपैकी १,०५७ सदनिका या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी आणि ३,४०९ या अल्प उत्पन्न गटासाठी उपलब्ध आहेत. २७ जुलै २०२० पासून ऑनलाइन अर्ज नोंदणीला सुरुवात होऊन सदर योजनेस उत्तम प्रतिसाद लाभला. अर्ज नोंदणी, शुल्क भरणा इ. सर्व प्रक्रिया या पारदर्शक अशा ऑनलाइन पद्धतीने पार पडल्या.

सदर सोडतीचे https://lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावर वेबकास्टींगच्या माध्यमातून थेट प्रक्षेपण करण्यात येऊन अर्जदारांना घरबसल्याही निकाल पाहण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच निकालाविषयीची अद्ययावत माहितीही सदर संकेतस्थळावर पाहता येणार आहे.

---

मा.संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**